महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/वि.मा.रा.फो./२०२२/४६८८ दिनांक : 07 OCT 2022

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित. संस्था

**विषय : - विद्यमान मा. राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मू यांचे छायाचित्र कार्यालयात लावणेबाबत.**

संदर्भ : - म.शा.सा.प्र.वि. यांचे शासन निर्णय क्रमांक : राछाप्र:-३३३२/प्र.क्र.१४६/२९, दिनांक : ३० सप्टेंबर, २०२२.

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांच्या संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, विद्यमान मा. राष्ट्रपती यांचे छायाचित्र कर्यालयात लावण्याचे संकेत वरील शासन निर्णयानुसार दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमूखांनी संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करुन विद्यमान मा. राष्ट्रपती यांचे छायाचित्र शासन निर्णयाप्रमाणे विहीत आकाराचे उपलब्ध करुन घेण्यात यावे, व छायाचित्र कार्यालयात लावण्यात यावे.

सोबत : संदर्भीय शासन निर्णय.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १ प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**शासकीय/निमशासकीय कार्यालयात**
**विद्यमान मा. राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मू**
**यांचे छायाचित्र प्रदर्शित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राछाप्र-३३२२/प्र.क्र.१४६/२९,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३० सप्टेंबर, २०२२.

**शासन निर्णय :-**

विद्यमान मा. राष्ट्रपती तसेच मा. पंतप्रधान यांचे छायाचित्र शासकीय/निमशासकीय कार्यालयात लावण्याच्या संकेतानुसार मा. राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मू यांचे शासनाने विहीत केलेल्या १६" X २२" आकाराचे रंगीत छायाचित्र मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री यांची दालने तसेच सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांमधून लावण्यात यावे, असे या शासन निर्णयान्वये सुचित करण्यात येत आहे.

२. मा. राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मू यांचे छायाचित्र मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय मुंबई / नागपूर / पुणे /औरंगाबाद / कोल्हापूर यांचेमार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे. संबंधित विभाग/ कार्यालये यांनी संबंधित शासकीय मुद्रणालयाकडे संपर्क साधावा. शासकीय मुद्रणालयांनी मागणीनुसार छायाचित्राचा पुरवठा करावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार छायाचित्राची प्रत संबंधीत शासकीय मुद्रणालयातून प्राप्त करणेबाबत व छायाचित्राची चौकट (फ्रेम) करून कार्यालयांमधून प्रदर्शित करण्याबाबत सूचना द्याव्यात. छायाचित्र व चौकट (फ्रेम) प्रित्यर्थचा खर्च संबंधीत शासकीय विभाग/कार्यालयांना मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागवावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०९३०१४५६४५८१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JANA JIVA VALVI

Digitally signed by JANA JIVA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=816d3fe4c7042f66b4ac73a1f0087cd8fda3e115d42dc8b54c0e783064c80dc1, pseudonym=BC7303629AB7AFCABCE15C55D2BEFE77F3006E6E, serialNumber=FD6F9785FE220B2C0F30D422D401E2DFC838A0D9EC621401534F5B36EAF57F26, cn=JANA JIVA VALVI
Date: 2022.09.30 14:57:46 +05'30'

**( ज. जि. वळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा .राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, मलबार हिल, मुंबई,